प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सांगली

दुरध्वनी कमांक - ०२३३-२३७२७१७ ई मेल-eoprisang@gmail.com

जा.क्र..क्रं.जिपसां/प्राशिवि/आस्था-१९ / 4015 /२०२६. दिनांक- 26 / 05 /२०२६

## नमुना दोन

ग्राम :-

युडायस कमांक :-

| २ | ७ | ३ | ५ | १ | १ | ० | ० | ३ | ० | ५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

व्यवस्थापक :- सरस्वती एज्युकेशन सोसायटी खारघर नवी मुंबई

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

महोदय,

आपल्या दिनांक-१५-१०-२०२५ या अर्जाच्या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/शाळेची केलेली तपासणी या आधारे,मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.सांगली दिनांक- ०१/०४/२०२५ पासून दिनांक-३१/०३/२०२८ पर्यत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता १ ली ते ८ वी करीता **सरस्वती ग्लोबल स्कूल कडेपूर (सीबीएसई) ता कडेगाव जि. सांगली** या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यताही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे:-**

१.मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२.बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम,२००९(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम,२०११(जोडपत्र एक) मधील तरतुदीचे शाळा पालन करील.

३.शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना,पहिल्या इयत्तेत,त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५ मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की,पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४.परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूती मिळेल,अशी प्रतिपूर्ती मिण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५.संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकांस भाग पाडणार नाही.

६.कोणत्याही बालकांस वयाच्या पुराव्याच्या अभावी,धर्म जात किंवा वंश,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणस्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

७.(एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याहीबालकांस शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास,नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धरीत केलेली किमान अर्हता धारण करण-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल.परंतु आणखी असे की अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण करण-या शिक्षकांना अशी किमान किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता पाच वर्षाच्या कालावधीत संपादीत करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची / तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील,आणि

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणी कामात स्वताला गुंतवून घेउ नये.याची सुनिश्चिती शाळा करील.

८.शाळा समुचित प्राधिकारणाने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

९.शाळा,अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०.शाळा,अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे पालन करील.

मागील तपासणीच्या वेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या.

- शाळेच्या परिसराचे क्षेत्र :- १६६००.०० चौ.मी.
- एकूण बांधकाम क्षेत्र :- २८१०.०० चौ. मी.
- खेळाचे मैदानाचे क्षेत्र :- ३०५६.०० चौ.मी.
- वर्ग खोल्यांची संख्या :- १७

Scanned with OKEN Scanner

- कार्यालय भांडार मुख्याध्यापकाची खोली :- उपलब्ध आहे
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनग्रहे - जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनग्रहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. :- उपलब्ध आहे
- पिण्याच्या पाण्याची सुविधा :- उपलब्ध आहे
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाक घर :- उपलब्ध नाही
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रीडा विषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता :- उपलब्ध आहे
- वाचन साहित्य विनाशायारा उपलबध :- उपलब्ध आहे

११.मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया.शाळेच्या नावांने परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहित.

१२.शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या किंवा कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३.शाळा,सोसायटी नोंदणी अधिनियम,१८६०(१८६०चा२१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४.शाळा कोणत्याही व्यक्तीच्या,गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्या येत नाही.

१५.शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत.प्रत्येक लेख विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-याकडे पाठविण्यात यावीत.

१६.तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक युडायसक्रमांक

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ७ | ३ | ५ | १ | १ | ० | ० | ३ | ० | ५ |

पत्रव्यवहार करताना तो नमुद करावा नोद घ्यावी.

१७.शिक्षक संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तींची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेने सादर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८.संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

१९.जोडपत्र 'तीन' नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

Digitally signed by
Mohan Sambhaji Gaikwad
Date: 26-05-2026
12:08:42

( मोहन गायकवाड )
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद सांगली.

Scanned with OKEN Scanner